# दस्त नोंदणी प्रक्रीयेत खोटी बतावणी व इतर कृत्याबाबत होणारी चौकशी

False personation act and other activity in document registration process.

## विषय ओळख (About)

दस्तात नमुद केलेल्या नावाच्या पक्षकाराचे ऐवजी दुसराच पक्षकार दुय्यम निबंधक यांचेसमोर उपस्थीत होउन त्यांने कबुलीजबाब दिलेला आहे किंवा खोटे नकाशे, भाषांतरे व बनावट शासन आदेश/ ना हरकत प्रमाणपत्रे सादर करुन दस्त नोंदणी केलेला आहे, अशा स्वरुपाच्या तक्रारी दाखल होतात व दुय्यम निबंधक, जिल्हा निबंधक यांचेकडे कलम 83 नुसार गुन्हा दाखल करणेची परवानगी मागितली जाते.

अशी परवानगी देणेकामी, खरोखरच कलम 82 मध्ये नमुद कृत्ये ही जाणीवपुर्वक केली असल्याची खातरजमा होणे आवश्यक असते. यासाठी तक्रारदाराने, त्याचे तक्रारीचे पृष्टठयर्थ सर्व कादगपत्रानिशी पुरावे दाखल करणे अभिप्रेत असते. अशा तक्रारीमध्ये संबधित जिल्हा निबंधक चौकशी केली जाते. चौकशीमध्ये तक्रारदार, दस्तातील पक्षकार, ओळखदार व आवश्यकता असल्यास साक्षीदार यांचे म्हणणे घेणे आवश्यक असते. चौकशी अंती जिल्हा निबंधक हे आवश्यकता असल्यास, कलम 83 खाली गुन्हा दाखल करण्याचे आदेश पारीत करतात. यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< कायदेशीर तरतुदी< दस्त नोदंणी प्रक्रीयेमध्ये बनवटीकरण पहावे.